# ।। सतगुरू सत्ता को अंग ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

* वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

## ।। अथ सतगुरू सत्ता को अंग लिखंते ।।


।। चौपाई ।।

**सतगुरू सता न बर्णी जाई ।। सो मण रास बानगी माई ।।**
**सतगुरू सत्ता सिष मे आवे ।। अगम देस हंसा चल जावे ।।१।।**

सतगुरुची सत्ता ही मायेच्या शब्दांद्वारा जशीच्या तशी पूर्णत: वर्णन केल्या जात नाही पूर्णत: वर्णन न करता येण्याचे कारण माया नश्वर आहे आणि ही सत्ता अमर आहे, तरीही जगाला सतगुरु सत्ता समजावी याकरीता जगातील मायावी दाखले देऊन सतगुरुंनी सत्ता समजविण्याचा प्रयत्न केला आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सतगुरु सत्ता शिष्यात जेव्हा जागृत होते तेव्हा शिष्य म्हणजे हंस काळाचा ३ लोक १४ भवनाचा भवसागर पार करुन महासुखांच्या अगम देशात जातो. ।।१।।


**चुगे चिकोर चंद मुख जोवे ।। सितळ अगन किसी बिध होवे ।।**
**ससी को इम्रत बसे सरीरा ।। साचा गुरू चंद्रमण हीरा ।।२।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,शशी म्हणजे चंद्राच्या शरीरात कुद्रतीच अमृत भरलेले राहते.या अमृतात ही सत्ता असते की,तिच्याने चंद्राला सूर्याचा अतीभारी तेज ही चंदनासारखा शितल सुखदायक लागतो.अशा चंद्राशी चकोर पक्षाला प्रिती राहते.




या प्रितीच्या कारणाने तो चंद्राच्या मुखाला निहारत राहतो. या निहारण्याच्या प्रकृतीने चंद्राच्या तनातील अमृत चकोरच्या नयनद्वाराने चकोर पक्षाच्या तनात उतरते.हे अमृत चकोर पक्षीत प्रगट होऊन गेल्या कारणाने चंद्रासारखे त्यालाही अग्नीचे निखारे शितल लागतात आणि तो पक्षी निखारे खाण्यात आनंद घेतो.चंद्रमणी हिरा पौर्णिमेच्या चंद्राच्या प्रकाशाने काचेच्या तुकड्यांनाही आपल्या सत्तेच्या बळाने आपल्या इतकाच तेजस्वी हिरा बनवितो तसेच खरे सतगुरु राहतात.हे जसे काळापासून मुक्त अमोलक आहे तसेच शिष्याला काळापासून मुक्त अमोलक बनवितात. ।।२।।

**आप अमोलक और बणावे ।। दिप राग दिपक जग जावे ।।**
**यूं सिष कोई क्रणी का हीणा ।। आप समान करे प्रबिणा ।।३।।**



जसा दिपक रागाने न चेतलेला दिवा आपोआप चेतून जातो तसेच खऱ्या सतगुरु पासून मोह मायेच्या भ्रमात आंधळा झालेला हंस चेतून जातो म्हणजे वैराग्य विज्ञान ज्ञानी बनून जातो.शिष्य कसाही करणीचा हीन राहिला तरीही तो शिष्य सतगुरु मधील सतस्वरुप विज्ञानासारखा सतस्वरुपी विज्ञानी बनून जातो.।।३।।

**धिन धिन ज्यांरी सफळ कमाई ।। ज्यां संगत सतगुरू की पाई ।।**

**उड़ उड़ भुजंग चंदण बण जावे ।। यूं सिष तनकी तपत बुझावे ।।**
**अंग ज्वाळा ब्यापे नही कोई ।। युं संगत सतगुरू की होई ।।४।।**

ज्याला सतगुरुची संगत मिळाली त्याची काळापासून मुक्त होण्याची कमाई सफल झाली ते धन्य आहे,ते धन्य आहे आणि त्यांची कमाई ही धन्य आहे.भुजंग म्हणजे पंख आलेला विषारी नाग.याच्या घटात त्याच्या विषाच्या कारणाने सहन होत नाही अशी भारी तपन प्रगट झालेली राहते.सहन होत नाही अशा तपनला मिटविण्याच्या शोधात तो उडत राहतो.जस्स त्याला चंदनाचे झाड मिळते तो त्याला लपेटतो. लपेटताच त्याची भारी तपन मिटून जाते आणि तो विषाच्या तपनपासून मुक्त होतो. याच प्रकारे त्राहीमान त्राहीमान करायला लावणारी आधी,व्याधी,उपाधी या तिन्ही तापांची ज्वाळा सतगुरुची संगत प्राप्त होताच शिष्याची नष्ट होऊन जाते.।।४।।

**जड़ी सजीवण जीव जिवाया ।। क्या करणी मुड़दो कर आया ।।**
**अमर करे अमीरस पावे ।। युं सतगुरू की सता कवावे ।।५।।**

जडी संजीवन मुर्द्याला जिवंत करते.घटना:–वाहत्या नदीत एकीकडून संजीवन बुटी वाहत येते आणि दुसऱ्याकडून मुर्दा वाहत येतो.नदीच्या लाटांच्या उसळ्यांनी संजीवन बुटी मुर्द्याच्या तोंडात जाऊन पडते,ज्याच्याने मुर्दा जिवंत होऊन जातो.मुर्द्याने कोणते असे मेल्यानंतर पुन्हा जिवंत होणे अशी कोणती करणी केलेली नव्हती तरीही ते जिवंत झाले.जर तो जिवंत झाला नसता तर संजीवनी बुटीचे मुर्द्याला जिवंत करण्याचे ब्रीद गेले असते.याचप्रकारे सतगुरुची सत्ता असते,शिष्य करणीचा कसाही नीच असला आणि सतगुरुच्या शरणात समजून विचार न करता नासमजमध्ये आला तरीही तो शिष्य सतगुरुच्या सत्तेने काळाच्या पलीकडच्या महासुखाच्या अगम देशास पोहचतोच पोहचतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,जसे कोणाला अमृत पाजले तर अमृत पिणारा जीव कित्येक जन्मांपर्यंत अमर होऊन जातो(संतांनी महाप्रलयापर्यंत सांगितले आहे म्हणजे रोगांनी तो महाप्रलयापर्यंत मरत नाही पण अन्य अपघात इ. दुसऱ्या कारणांनी जरुर मरु शकतो.)अशा प्रकारे सतगुरुची सत्ता आहे.ही सत्ता शिष्याला अमृतरुपी शब्द पाजून अमरलोकास पोहचवून सदाकरीता अमर करते. ।।५।।

**पारस का सुण प्राक्रम भाई ।। लोहा पलट कंचन होय जाई ।।**
**ब्होरूं काट न लागे कोई ।। ओ प्राक्रम सतगुरू मे होई ।।६।।**

जसे पारस हा दगड आहे.त्याच्यात हा पराक्रम आहे की,त्याच्या पराक्रमाने लोखंड सोने होऊन जाते.लोखंडाचे सोने बनल्यावर त्या सोन्याला म्हणजे पूर्व लोखंडाला सोने बनण्याच्या आधी गंज लागत होता आणि त्याचा विनाश होत होता,तो गंज आता लागत नाही,याच प्रकारे सतगुरुमध्ये पराक्रम आहे.शिष्य सतगुरुला भेटल्यानंतर शिष्याला

वारंवार जन्मण्याचा मरण्याचा गंज लागत नाही.एकदा शरीर सोडले की,तो अमरलोकातच जातो पुन्हा जन्मणे,म्हातारे होणे,मरणे या चक्रामध्ये येत नाही. ।।६।।

**कल ब्रछ पूरे मन की आसा ।। युं सतगुरू हे सुख की रासा ।।**
**चिंत्रावण चिंत्या फळ पावे ।। युं सतगुरू निज नांव बतावे ।।७।।**

जसे कल्पवृक्ष मनाच्या कल्पनेनुसार मायेच्या सुखांची इच्छा पूर्ण करतो याचप्रकारे सतगुरु जीवाच्या निजमनाच्या सुखांची आशा पूर्ण करतात.सतगुरु कल्पवृक्षाहून अधिक सुखांचे भंडार आहेत.चिंतामणी,जीव ज्या ज्या सुखांचे चिंतन करतो ते पूर्ण करतो.जसे एका मूर्खाला चिंतामणी मिळाला.तो मूर्ख तर चिंतामणीच्या गुणाला जाणत नव्हता परंतु त्याच्या हातात चिंतामणी होता आणि हातात चिंतामणी असल्याकारणाने जसे चिंतन करतो तसे होऊन जाते.त्याला रस्त्याने चालता चालता भूक लागली तेव्हा त्याने मनात चिंतन केले की,काही खायला मिळाले तर चांगले होईल असे चिंतन करताच तेथे मिठाईचे ताट आले.तो ती मिठाई खाऊन त्याने चिंतन केले की,खायला तर मिळून गेले परंतु पाणी पाहिजे असे चिंतन करताच स्वच्छ,निर्मळ,थंड पिण्यासारखे पाणी उत्पन्न झाले.या मूर्खाला पाणी पिल्यानंतर सावलीत बसण्याचे मनात येऊन चिंतन केले की,येथे सावलीत बसण्याकरीता घर असते तर सावलीत बसलो असतो. येथे घर पाहिजे असे चिंतन करताच हवेली,महाल तयार होऊन गेले.त्या घरात बसून झोपण्याची इच्छा केली तर पलंग,नोकर,चाकर,दास,दासी असते तर सर्वांचा उपभोग घेतला असता तर हे असले पाहिजे असे म्हणताच पलंग,दास दासी,नोकर, चाकर सर्व होऊन गेले.याचप्रकारे सतगुरु शिष्याला निजनामरुपी चिंतामणी सांगून शिष्याचे निजमन ज्या ज्या अनंत सुखांची इच्छा करते ते पूर्ण करतो.।।७।।

**जुरा काळ जम को डर भागे ।। जे निजनाव सिष मे जागे ।।८।।**

असे चिंतामणरुपी निजनाव शिष्यात प्रगट होऊन गेल्याने जीवाचे वारंवार जन्म होऊन म्हातारपणाचे दु:ख भोगणे व काळ म्हणजे यमाचे जालिम कष्ट क्षणा क्षणाला सहन करणे,हे सर्व भारी दु:ख नष्ट होऊन जातात आणि नेहमी क्षणाक्षणात अमरापूरात महासुख मिळते. ।।८।।

**सतगुरू सत्ता कही नही जावे ।। नग पंखि हीरा निपजावे ।।**
**ओ इचरज मानो मत कोई ।। कीट पलट भंवरा किम होई ।।९।।**

सतगुरु सत्तेचा पराक्रम सांगितला जात नाही.ज्या प्रकारे नगपक्षी समुद्रात हिरे निपजवितो याचप्रकारे सतगुरुची सत्ता शिष्याच्या घटात हिऱ्यासारखे अनंत सुख निपजविते.भुंगा आपल्या पराक्रमाने कीट म्हणजे अळीचा देह पलटवून त्याला भुंगा बनवून देतो.हे एका देहापासून दुसरा देह बनविणे जगाच्या स्त्री पुरुषांना आश्चर्य वाटते परंतु गुरु महाराज

सांगतात,हे डोळ्यांसमोर होते याच आश्चर्य काय आहे?या भुंगाच्या सत्तेत हे गुण कुद्रतीच आहेत,याचप्रकारे सतगुरुच्या सत्तेत आहे.सतगुरुच्या सत्तेने ५ तत्वाचा मरणारा देह अमर अखंडीत ध्वनी तत्वाचा बनून जातो.आजपर्यंत काळ ज्या ५ तत्वाच्या देहाला चावून चावून खात होता,तोच देह पलटून ज्या देहाचे तेज काळ दुरुनही सहन करु शकत नाही असा तेजस्वी बनून जातो.।।९।।


**अमर बिवाण सीस चल आवे ।। पाँचू ग्यान गेब सूं पावे ।।**
**युं सता सतगुरू की भाई ।। जागे सबद सिष के माई ।।१०।।**

अमर विमानाच्या सावलीच्या खाली कोणी मनुष्य येऊन जातो त्याचा हा गुण होतो की, सावलीच्या खाली येणाऱ्या हंसाला अचानक न जाणता ५ ज्ञान(मतज्ञान,श्रृतज्ञान, अवधीज्ञान,मनपर्चेज्ञान,कैवल्य ज्ञान)प्रगट होऊन जाते तशीच सतगुरुची सत्ता आहे. जो शिष्य सतगुरुच्या सत्तेत येतो,त्या शिष्याच्या घटात पाचही ज्ञानासोबत सतशब्द प्रगट होऊन जातो आणि तो शिष्य सतगुरु सारखा वैराग्य विज्ञानी ज्ञानी बनतो.।।१०।।

**छाय हमाव हुवे रंक राजा ।। फिरे द्वाई क्हे महाराजा ।।**
**सतगुरू सत्ता सिष यूं लेवे ।। साध साधकर सब जुग सेवे ।।११।।**

जसे हुमायु पक्षीच्या सावलीच्या खाली कितीही दरिद्री मनुष्य आला तरीही तो मनुष्य त्याच शरीराने एकदम महाराजा होऊन जातो आणि त्याचा सर्व देशात हुकूम,आदेश चालू लागतो आणि सर्व देश–परदेशाचे लोक त्याला महाराजा म्हणू लागतात.याचप्रकारे सतगुरुत सत्ता राहते.या सत्तेचा शरणा जो शिष्य घेतो त्याला परमात्म्याचा साधू जाणून जगाचे मनुष्य तसेच ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती पासून होनकाळ पारब्रम्ह आणि इच्छा माया पूजतात आणि त्याची सेवा करतात.ज्याला कालपर्यंत एखाद मनुष्यही जाणत नव्हता,त्याला सतगुरुचा शरणा मिळताच ३ लोकाचे मालक ब्रम्हा,विष्णु,महादेव आणि या ब्रम्हा,विष्णु,महादेव मालकांचेही मालक,होनकाळ पारब्रम्ह आणि इच्छा पूजू लागतात. ।।११।।

**सतगुरू सत्ता जीव यूं जागे ।। चमक पथर लोहा उड़ लागे ।।**
**आ सुण सत्ता सतगुरा के माई ।। जड़ पशवा चेतन होय जाई ।।१२।।**




जसे चुंबकाला लोखंडाचा कीस उडून उडून लागतो असेच सतगुरुच्या सत्तेने जीव काळयुक्त मायावी सुखांच्या पलीकडच्या सतस्वरुपाच्या महासुखांसाठी जागृत होतात. सतगुरु सत्तेमध्ये हा गुण आहे की,शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध या पाचही भोगात पशु बुध्दी सारखे अती लिन झालेले जड जीव ही सतस्वरुप विज्ञान वैरागी संतासारखे चेतन होऊन जातात. ।।१२।।

**सतगुरू सत्ता सेज सिष झेले ।। अर्ध ऊर्ध बिच रामत खेले ।।**
**सास उसास रटे नित सांई ।। निर्मळ नेण खुले घट माँई ।।१३।।**

सतगुरुच्या शरणात येऊन जो शिष्य अर्ध उर्धमध्ये म्हणजे श्वास उच्छ्वासात रामनाम खेळाला नित्य खेळवेल म्हणजे नित्य रटण करेल त्याच्या घटात सतगुरुच्या सत्तेच्या कृपेने मळरहीत अगम देशाचे निर्मळ डोळे उघडतील.।।१३।।

**ऊगा सूर भया उजीयाळा ।। भ्रम क्रम मेटया अंधीयारा ।।**
**ब्होरू तिमर न ब्यापे कोई ।। झिग मिग जोत उदे घट होई ।।१४।।**

जगात जसे सूर्य उगवल्यावर सर्व सृष्टीचा अंधार मिटून जातो असेच सतगुरु सत्तेच्या कृपेने शिष्याच्या घटात विज्ञान ज्ञानाचा प्रकाश होतो.या विज्ञान ज्ञानाच्या प्रकाशाने हंसाचे सर्व भ्रम(भ्रम कोणते–वेद,व्याकरण,शास्त्र,पुराण तसेच त्रिगुणी मायेत पूर्ण सुख शोधण्याचा स्वभाव इ.)तसेच आजपर्यंत केलेल्या सर्व कर्मांनी आलेला आंधळेपणा मिटून जातो.अशा विज्ञान ज्ञानाची झिगमिग झिगमिग ज्योत शिष्याच्या घटात उदित झाल्यानंतर भ्रम व कर्माचा अंधार शिष्याच्या घटात पुन्हा कधीही प्रगटत नाही. ।।१४।।

**ज्यूं मुख दीसे दर्पण मांई ।। अरस परस सेवग अर सांई ।।**
**कोटक भाण हुवा उजीयारा ।। दिलही मे साहेब दीदारा ।।१५।।**

जसे आरशात पाहणाऱ्याला आपला चेहरा अरस परस दिसतो तसे शिष्याला घटात साई अरस परस दिसतो.जसे जगात सूर्य उगवल्यावर सगळीकडे प्रकाश होतो तसेच सतगुरुच्या विज्ञान सत्तेच्या कृपेने माझ्या घटात कोटी सूर्यांसारखा विज्ञान ज्ञानाचा उजेड झाला.माझ्या निजहृदयात( ●←निजहृदय)साहेबाचे नित्य दर्शन होऊन राहिलेत. ।।१५।।

**इम्रत बुंद झड़े कण मोती ।। दीपक ग्यान झिलामिल जोती ।।**
**मनवां चँवर करे मन माँई ।। ज्यां देखुं ज्याँ सतगुरू सांई ।।१६।।**

जसे पावसाळ्याच्या दिवसात पाण्याचे थेंब पडतात तसेच कधी मोत्या सारख्या गारा पडतात,असेच शिष्याच्या घटात अमृताच्या गारांची आणि थेंबांची झडी लागते.जसे दिवाळीच्या दिवसात हृदयाला मोहित करणारी दिव्यांची झिगमिग,सगळीकडे दिसते असेच विज्ञान ज्ञानरुपी दिव्यांची झिगमिग माझ्या पूर्ण घटात लागून गेली.या सर्व आश्चर्याच्या गोष्टी पाहून माझे निजमन सतगुरुच्या सत्तेचे निजमनातच आश्चर्य करु लागला.जसे सती स्त्रीला पूर्ण जगामध्ये फक्त तिचाच पती एकमात्र पुरुष दिसतो आणि अन्य पुरुष बालक दिसतात असे मला घटात तसेच घटाच्या बाहेर फक्त सतगुरु साई दिसतो बाकी सर्व देवी देवता तसेच मनुष्य,काळ व काळाने मारलेले मुर्दे दिसतात. ।।१६।।

सतगुरूजी की मे बल जाई ।। अेसो भेद दियो मुज आई ।।
तन देवळ बिच आत्मदेवा ।। निर्गुण भक्त भजन अे भेवा ।।१७।।

अशा सतगुरुच्या सत्तेच्या चरणी माझा प्राण समर्पित आहे.जसे जगात देवता आणि त्यांचे मंदिर असतात असेच सतगुरुने आपल्या सत्तेने माझेच घट मंदिर बनवून दिले आणि त्या मंदिरात मला आत्म्याचा देवता परमात्मा पाहण्याचाही भेद दिला तसेच त्या निर्गुण साईची भजन भक्ती करण्याचा भेदही दिला.निर्गुण साई सुखाचा सागर आहे आणि निर्गुण काळ दु:खाचा भंडार आहे.।।१७।।

पेम फूल मनवा ले आवे ।। चित्त का चंदण ले च्रचावे ।।
सेवा बंदन आर्ती कीजे ।। तन मन वार अमीरस पीवे ।।१८।।

जसे देवाकरीता भक्त फूल आणि फूलांचे हार आणतात असे माझे निजमन सतस्वरुप साईसाठी प्रेमाचे फूल आणतो आणि जसे देवतांना भक्त चंदन चर्चवितात तसे माझे निजचित्त सतस्वरुप साईला प्रितीचे चंदन चर्चवितो.अशाप्रकारे सतगुरुच्या सत्तेने घटात प्रगट झालेल्या सतस्वरुप ने:अक्षर साईची सेवा आणि बंदगी करा व आरती करा.हे शरीर आणि मन सतगुरुच्या चरणी समर्पित करा आणि विज्ञान ज्ञानाचे अमृत प्या. ।।१८।।

धूप ध्यान लागो दिन राती ।। दिपक ग्यान प्रीत की बाती ।।
सुखमण कळस अमी भर लाई । झिग मिग झिग मिग मिंदर मांई ।।१९।।

जसे जगात साधू ध्यान लावायच्या वेळी धूप रात्रंदिवस जाळतो तसे सतस्वरुपाचे ध्यान लावायच्या वेळी प्रेमाचा धूप रात्रंदिवस जाळा.जसे मंदिरात दिव्यात कापसाची वात ठेवून वातीला चेतावतात तसे तन मंदिरात विज्ञान ज्ञानाच्या दिव्यात ज्ञानाच्या प्रितीची वात चेतवा.जसे मंदिरात महिला भक्त पाण्याचे कळस भरुन आणते तसे तन मंदिरात सुखमना अमृताचे कळस भरुन आणते.जसे मंदिरात दिव्यांच्या कारणाने आनंद देणारी झिगमिग झिगमिग होते तसे माझ्या घटात विज्ञान ज्ञानाच्या दिव्यांची लोभविणारी झिगमिग लागली. ।।१९।।

मुरळी बीण बजे सुरनाई ।। संख की घोर गिगन घर छाई ।।
अनहद झालर का झणकारा ।। रूम रूम बोले ररंकारा ।।२०।।


जसे मंदिरात भक्त बासरी वाजवितात,वीणा वाजवितात,सुरनाई वाजवितात तसे माझ्या घटात ने:अक्षरच्या सत्तेने तोंडाने न वाजवता बासरी,वीणा आणि सुरनाई वाजून राहिली. मंदिरात भक्त शंख वाजवितात आणि त्या शंखाच्या घोर आवाजाने मंदिर भरुन जाते तसे माझ्या पूर्ण घटात आकाशापर्यंत ने:अक्षरच्या सत्तेने मुखाने न वाजवता शंखाचा घोर आवाज गगन घरापर्यंत भरुन गेला.जसे भक्त मंदिरात झालर वाजवतो आणि

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

त्याचे झणकार मंदिरात सगळीकडे ऐकू येतात तसे माझ्या घटात सतगुरु सत्तेच्या कृपेने हाताने झालर न वाजवता,झालर सारखे पूर्ण घटात गिगन घरापर्यंत अनहद झणकारे ऐकू येऊन राहिले आहेत.जसे मंदिरात स्त्री–पुरुष राम राम राम राम सारखी धुन बोलतात तसे माझ्या शरीरात पूर्ण ३,५०,००,०००(३ कोटी ५० लाख)रोमात अखंडित ररंकारची ध्वनी लागून गेली.।।२०।।

**जन सुखराम सता आ जागी ।। ब्रम्ह समाध ब्रम्हंड मे लागी ।।**
**दसवे द्वार करे हंस केळा ।। अनंत कोट संतन का मेळा ।।२१।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की, सतगुरुची सत्ता जागृत झाल्यावर हंस




ब्रम्हाडांत पोहचतो आणि सदाकरीता ब्रम्हाडांत दहाव्याद्वारात राहतो आणि तेथे हंसाची सतस्वरुप ब्रम्हच्या सोबत समाधी लागते.तेथे दहाव्याद्वारात अनंत कोटी संतांचा मेळा आहे.दहाव्याद्वारी पोहचल्या वर हंसाच्या अनंत कोटी संतांसोबत भेटीगाठी होतात आणि तेथे हंस संतांसोबत अनेक प्रकारचे नित्य नवे नवे खेळ क्रिडा करतो. ।।२१।।

**अे सो समीयो सदा हमारे ।। आँठो पोहर संज्या क्या संवारे ।।**
**जन सुखराम अमर घर पाया । जामण म्रण मोहो नही माया ।।२२।।**

माझे त्या संतांसोबत नाना तऱ्हेचे खेळ क्रिडा खेळण्यात अष्टोप्रहर,सकाळ संध्याकाळ व्यतीत होतात,अशी आनंदमग्नाची वेळ माझी नेहमी राहते.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,असे काळाच्या दु:खापासून मुक्त आणि महाआनंद देणारे अमर घर मी प्राप्त केले.मी असे अमर घर(अमरलोक)प्राप्त केले की आता माझे काळाच्या महादु:खात जन्मण्याचे,मरण्याचे भय सदाकरीता मिटून गेले.याचप्रकारे काळाच्या देशात ढकलणारे आई,वडिल,पत्नी,मुलगा,धन,राज्य,पदवी,इ.मायावी वस्तूं मधील मोहमाया मिटून गेली. ।।२२।।

दोहा ।।

**जन सुखिया सतगुरू सत्ता ।। मोपे कही न जाय ।।**
**ज्यूं मुज बरती आय के ।। सो बिध कही सुणाय ।।२३।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सतगुरुची सत्ता मी चंद्र आणि चकोर पक्षी,दिपक राग,चंद्रमणी हिरा आणि काच,भुजंग आणि चंदन,संजीवनी बुटी आणि मुर्दा,लोखंड आणि पारस,कल्पवृक्ष,चिंतामणी,नगपक्षी,अमृत,हुमायु पक्षी आणि दरिद्री, चमक दगड आणि लोखंडाचा कीस इ.मायेतील उदाहरण देऊन जगाला समजविले परंतु सतगुरु सत्ता इतकी अगाध आहे की,ती मला कोणताही दाखला देऊन जशीच्या

तशी समजविता आली नाही आणि येणार ही नाही.सतगुरु सत्तेची जी विधी माझ्यात प्रगटली ती मी मायेच्या शब्दांमध्ये समजविता येते म्हणजे ज्ञानाने वर्णन करता येते ते सर्व दाखले देऊन माझ्यात प्रगट झालेल्या विधीला सांगितले. ।।२३।।

।। इति सतगुरू सत्ता को अंग संपूरण ।।